**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ३६-अ नुसार आदिवासींच्या जमिनी हस्तांतरणास परवानगी देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-संकीर्ण-२०१०/१८१२/प्र.क्र.३०९/ल-९,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०२ एप्रिल, २०१२.

## परिपत्रक

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ३६अ नुसार कोणीही अनुसूचित जमातीयेतर व्यक्ती/संस्थांना शासनाची पुर्वपरवानगी घेतल्याखेरीज अनुसूचित जमातीच्या खातेदारांची जमीन विक्रीव्दारे, देणगी देऊन, अदलाबदल करुन, गहाण ठेऊन, पट्ट्याने देऊन किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करुन घेता येत नाहीत. आदिवासी व्यक्तींच्या जमिनी जनजातीयेतर व्यक्तींकडे हस्तांतर करण्यास उक्त अधिनियमाच्या कलम ३६अ नुसार व महाराष्ट्र जमीन महसूल (जनजातीच्या व्यक्तीने जनजातीयेतर व्यक्तीकडे भोगाधिकार हस्तांतरीत करणे) नियम, १९७५ मधील तरतुदीस अधीन राहून अकृषिक कारणास्तव जमीन हस्तांतर करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी परवानगी देण्यास शासनाकडून पुर्वमंजूरी दिली जाते. अशा परवानगी प्रकरणात मूळ आदिवासी खातेदार भूमीहिन होणार नाहीत याची खातरजमा करणे आवश्यक असते. जर मूळ आदिवासी खातेदार अशा विक्री परवानगीमुळे भूमीहिन होत असल्यास त्यास अन्य पर्यायी जमीन खरेदी करुन दिल्यानंतर व त्या जमिनीचे अभिलेख आदिवासी खातेदारांच्या नावे तयार झाल्यानंतरच आदिवासी खातेदारांच्या जमिनीच्या हस्तांतरणासंबंधातील परवानगीचे आदेश निर्गमित करावेत असे आदेश/सूचना शासनाने यापूर्वीही शासन परिपत्रक क्रमांक-आदिवासी-३०१०/प्र.क्र.३१३/ल-९, दिनांक १५.९.२०१० अन्वये दिलेल्या आहेत.

२. दिनांक ४.१.२०१२ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महाराष्ट्र जनजाती सल्लागार परिषदेच्या बैठकीमध्ये, आदिवासी व्यक्तींच्या जमिनी बिगर आदिवासी व्यक्तींना हस्तांतरीत करण्यास विक्री परवानगी दिल्या जाणाऱ्या प्रकरणांमध्ये आदिवासी व्यक्ती भूमीहिन होत असल्याचा मुद्दा मान्यवर सदस्यांनी उपस्थित केला होता. सबब याअनुषंगाने, आदिवासी व्यक्तींच्या जमिनी बिगर आदिवासी व्यक्तींना हस्तांतरीत करण्याच्या प्रकरणात मूळ आदिवासी खातेदार भूमीहिन होणार नाहीत याची

खातरजमा करण्यात यावी व भूमीहिन होत असल्यास त्यांना पर्यायी जमीन करेदी करुन दिल्यानंतर व त्या जमिनीचे अभिलेख आदिवासी खातेदाराच्या नावे तयार झाल्यानंतरच आदिवासी खातेदाराच्या जमिनीच्या हस्तांतरणासंबंधातील परवानगीचे आदेश निर्गमित करण्याबाबतच्या शासनाच्या आदेशांचे/सूचनांचे कोटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. असे शासनाचे निर्देश आहेत. विभागीय आयुक्त यांनी सदर निर्देश/सूचना सर्व संबंधितांच्या निदर्शसनास आणून देण्यात याव्यात.

३. हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक-२०१२०४०३०६४३३४४३४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानसार व नावाने,

(अरविंद शेटे)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व उप विभागीय आधिकारी
मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा. मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
आदिवासी विकास विभाग (कार्यासन-१४), मंत्रालय, मुंबई,
निवड नस्ती-कार्यासन-ल-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.